***

# सप्रेम भेट

***



प्रिय ______________________

प्रत्येकात नैसर्गिक गुणांनी युक्त एक हिरा दडलेला असतो. तुझ्यातील त्या हिऱ्याचा शोध घेण्याच्या प्रवासातील हे पहिलं पाऊल समज! त्यासाठीच हा पत्र–प्रपंच!!

**खूप-खूप आशिर्वाद आणि शुभेच्छा !**

______________________

# अर्पण पत्रिका

१०वी-१२वी चे निकाल लागल्यावर मुंबईतील कोणत्याही करीयर सेमिनारला जा, कितीही मोठा हॉल असला तरी जागा अपुरी पडते. पाय ठेवायलाही जागा उरत नाही. मग काही जण दाटीवाटीने आडोशाला उभं राहून तर काही जण हॉलच्या बाहेर लावलेल्या स्क्रिन वरील वक्त्यांचं भाषण मन लावून ऐकतात व आपल्या मनातल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात.

काहींना उत्तरं मिळतात. तर काही जण अंधारात चाचपडत राहतात. काहींना हेच माहिती नसतं कि त्यांना नेमकं कुठे जायचंय आणि असेही काही आहेत कि त्यांना कुठे तरी जायची तीव्र इच्छा तर असते पण मार्ग सापडत नाही, कसं जायचं हे माहित नाही. काहींना जायचं असतं एकीकडे आणि परिस्थितीचा, पालकांचा ओढा असतो भलतीकडे !

विशेष म्हणजे हि धावाधाव १०वी-१२वींचा निकाल लागून गेल्यावर होते. पण याचंच नियोजन जर १०वी-१२वीच्या सुरुवातीस केलं तर ते जास्त फायद्याचं ठरेल, नाही का?

ते करता यावं म्हणूनच या सर्व माझ्या लाडक्या हुशार पोरांना पत्ररुपी आशेचे किरण सप्रेम भेट !

तुमचा लाडका
भारु काका





व्यक्तीची प्रगती झाली तर कुटूंबाची प्रगती होईल.
कुटूंबे प्रगत झाली तर समाज प्रगत होतील.
समाज प्रगत झाले तर राज्ये प्रगत होतील
आणि राज्ये प्रगत झाली तर अवघा देश प्रगत होईल!

***

व्यक्तींच्या प्रगतीची मुळे त्यांच्या शैक्षणिक, बौध्दिक व
मानसिक विकासात दडलेली असतात.
या सर्वांगीण विकासात खारीचा वाटा उचलावा,
हातभार लागावा याच साठी हा पत्रप्रपंच !

भारुकाका

***




# यशस्वी करीयरची दिशा दाखवणारी
# भारुकाकाची पत्रे

**या पुस्तकाशी संबंधित ध्येये :**

- १०वी-१२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये स्वत:मधील क्षमतांविषयीची जाणिव विकसित करुन त्यांचा अधिकाधिक सर्वंकष विकास घडवून आणणे.
- दरवर्षी साधारणपणे लाखो विद्यार्थी १०वी-१२वी च्या परीक्षेत नापास होतात. त्यांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.
- १०वी-१२वी नापास झाल्यावर विद्यार्थ्यांमध्ये कमालीचे नैराश्य येते. पुढे ते आत्महत्येसारखी विनाशक पावलेही उचलतात. अशा विद्यार्थ्यांना निराशा टाळून उपलब्ध पर्यायाची जाणिव करुन देणे.
- याच विषयाशी निगडित पदवी पातळीवरील पुस्तके प्रकाशित करणे.
- महाराष्ट्राच्या गौरवशाली सामाजिक, शैक्षणिक परंपरेला अनुसरुन युवकांमध्ये नेतृत्वगुण व जबाबदारीची मानसिकता निर्माण करणे. देशापुढे आदर्श निर्माण करुन राज्याला मानाचे स्थान प्राप्त करण्यात सहभागी होणे.
- पुस्तकाच्या स्वरुपातील आपल्या भावना व ध्येये सरकारी यंत्रणा, बिगर सरकारी संस्था, राजकिय पक्ष यांच्यापर्यंत पोहोचवणे.
- प्रियदर्शिनी प्रबोधिनी व मानवी संसाधन विकास संशोधन संस्थेची स्थापना करणे.

**आमची ध्येये साध्य करण्यासाठी**
**आपली भूमिका व सहकार्य मोलाचे आहे.**